डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१ जुलै,२०२३ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.....

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

**वाचा :** १)वित्त विभाग शासन निर्णय क्र.मभवा-१३२३/प्र.क्र.६/सेवा-९, दि.२३ नोव्हेंबर,२०२३.
२)वित्त विभाग शासन निर्णय क्र. निमवा-२०२३/प्र.क्र.६०/ सेवा ४, २३ नोव्हेंबर,२०२३.

## आदेश

जा.क्र./अप्रवि/ मभवा-निमवा/२०२३-२४/१६१६. दिनांक : ३० /११/२०२३.

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दि.३० जून,२०२३ व दि.०५ जुलै,२०२३ अन्वये **७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचनेतील वेतन घेणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मूळ वेतनावरील व निवृत्तिवेतन धारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां मूळ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या एकूण रकमेवर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर दिनांक १ जुलै,२०२३ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ४२ टक्के वरुन ४६ टक्के (म्हणजेच सद्याच्या महागाई भत्यात ०४ टक्के वाढ) सुधारीत करण्यात आला आहे**. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील **अधिकारी/ कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां दिनांक १ जुलै,२०२३ पासूनच्या कालावधीतील महागाई भत्त्याची वाढ रोखीने देण्यात यावी.**

सदरहू महागाई भत्त्याची वाढ **माहे नोव्हेंबर २०२३ च्या नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात अदा करावी. दिनांक १ जुलै,२०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोंबर या कालावधीतील महागाई भत्ता थकबाकी माहे नोव्हेंबर,२०२३ देय डिसेंबर,२०२३ चे नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयक पारित केली जाणार नाहीत.**

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन **२०२३-२४** चे मंजूर **वेतन व निवृत्तीवेतन** लेखाशीर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनातंर्गत २०२३-२४ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने......

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

मागील पानावर........

R.RAUT Bud

**प्रतिः** १) नियंत्रण अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व)

.......................................................................................................

२) प्राचार्य, ..........................................................................................

३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

R.RAUT Bud

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील असुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना दि. ०१ जुलै,२०२३ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.....

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

**वाचा :** १)वित्त विभाग शासन निर्णय क्र.मभवा-१३२३/प्र.क्र.१६/सेवा-९, दि.२३ नोव्हेंबर,२०२३.
२)वित्त विभाग शासन निर्णय क्र. निमवा-२०२३/प्र.क्र.९४/ सेवा ४, दि.२३ नोव्हेंबर,२०२३.

## आदेश

जा.क्र./अप्रवि/ मभवा -निमवा/२०२३-२४/१६१७. दिनांक : ३०/११/२०२३.

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक ३० जून,२०२३ व दिनांक ०५ जुलै,२०२३ अन्वये **६ व्या वेतन आयोगानुसार असुधारीत वेतन संरचनेतील वेतन घेणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मूळ वेतनावरील व निवृत्तिवेतन धारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां मूळ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या एकूण रकमेवर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर दिनांक १ जुलै,२०२३ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर २२१ टक्के वरुन २३० टक्के (म्हणजेच सद्याच्या महागाई भत्यात ९ टक्के वाढ) सुधारीत करण्यात आला आहे**. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील **अधिकारी/ कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां दिनांक ०१ जुलै,२०२३ पासून महागाई भत्त्याची वाढ रोखीने देण्यात यावी.**

सदरहू महागाई भत्त्याची वाढ **माहे नोव्हेंबर-२०२३ देय डिसेंबर-२०२३ च्या नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात अदा करावी. दिनांक ०१ जुलै,२०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोंबर,२०२३ या कालावधीतील थकबाकी महागाई भत्त्याची थकबाकी देयके माहे नोव्हेंबर-२०२३ देय डिसेंबर-२०२३ चे नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयक पारित केली जाणार नाहीत.**

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन **२०२३-२४** चे मंजूर वेतन व निवृत्तीवेतन लेखाशीर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनातंर्गत २०२३-२४ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने......

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

मागील पानावर........

R.RAUT Bud

**प्रतिः** १) नियंत्रण अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व)

..........................................................................................................

२) प्राचार्य, ..........................................................................................

३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

R.RAUT Bud